पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२०/०९/२०२३
## दि.१९/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २०७/२०२३,भादविक ३०७,३२४,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८ वर्षे,रा.गणेशपुरी वस्ती,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०९/२०२३ रोजी १६/३० वा.हत्ती गणपती चौक,ज्ञानप्रबोधिनीच्या बाजुला,सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पती गणेश मगर,वय-३४ वर्षे व मुलगा याचेसह ते पुर्वी लावत असलेल्या जागेच्या बाजुला वडापावचा गाडा लावण्याची तयारी करत असताना,यातील नमुद दोन इसम व एक महिला यांनी आपसात संगनमत करून,त्यांचे जागेवर फिर्यादी यांनी वडा पावचा गाडा लावलेचे कारणावरून,फिर्यादी यांनी वडापावचा गाडा लावु नये,यासाठी त्यांचेशी वाद घालुन त्यांची गाडाची मालकीन व फिर्यादीस शिवीगाळ करून,इतरांनी त्यांना काठीने मारहाण केली. तसेच गणेश मगर यांचे डोक्यात पाठीमागुन वडापाव तळण्याची कढई मारुन, त्यांना गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. फरताडे ९८९२८४९२६२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ६६३/२०२३,भादविक ४५२,३९४,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४९ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचा साथीदार इसम व इतर दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०८/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा.पॅनकार्ड क्लब रोड,बाणेर,पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती यांनी आ.क्र.१ यांचेकडुन व्यवसायासाठी २० लाख रुपये सुमारे सहा महिन्यापुर्वी घेतले होते. सदरचे पैसे त्यांना परत केले असतानादेखील त्यांनी फिर्यादी व त्यांचे पती यांना जादा रक्कमेची मागणी करुन,फिर्यादी यांचे घरी घुसुन,फिर्यादी व त्यांचे पती यांना मारहाण करुन फिर्यादी यांचेकडील १०,००,०००/- रुपये रोख रक्कम,सोन्या-डायमंडचे दागिने,महत्वाचे कागदपत्रे व गाडीच्या चाव्या असा एकुण २५,४०,०००/- रू किचा ऐवज मारहाण करुन जबरदस्तीने घेऊन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, रत्नदिप गायकवाड ७०२०९११९५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४१३/२०२३,भादविक ३३६,३३८ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२१ वर्षे,रा.मांजरी बुद्रुक,मांजरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०९/२०२३ रोजी पहाटे ०३/०० वा.मांजरी रेल्वे स्टेशनच्या ब्रिजखाली कच्या रोडच्या कडेला,मांजरी,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील राजाभाऊ नामदेवराव चंदेल,वय-४७ वर्षे हे स्विग्गीचे पार्सल डिलीव्हरी करण्यासाठी मांजरी रेल्वे स्टेशनच्या ब्रिजच्या खाली कच्च्या रोडच्या कडेला मांजरी,पुणे येथे थांबलेले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे हातातील कोणत्यातरी हत्याराने हयगयीने व निष्काळजीपणाने हवेत फायर केले असता,ते त्यांचे छातीच्या वरच्या बाजुस लागुन,त्यांना किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, एस.डी.दाभाडे ९३२२३५८०२७

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे १४१५/२०२३,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** एक नागरीक,वय १९ वर्षे,रा.मांजरी-बुद्रुक,पुणे

**आरोपीत** तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/०९/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा.महादेवनगर मांजरी रोडवरील नविन ओव्हर ब्रिजवर, मांजरी-बुद्रुक,पुणे,ता.हवेली,जि.पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे महादेवनगर मांजरी रोडवरील नविन ओव्हर ब्रिजवर मोबाईल फोन पाहत बसले असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जवळील ५०,०००/- रू किमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.)

**त.अंमलदार** पो.उप.निरी. ए.आर.गांधले ९३७००७६३०५

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** फरासखाना पो स्टे १७६/२०२३,भादविक ३७९

**फिर्यादी** दिनेशकुमार खंडेलवाल,वय-४६ वर्षे,रा.१२/१५,गुरुवार पेठ,पुणे

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१९/०९/२०२३ रोजी सकाळी ११/५० वा.ते दुपारी १२/३० वा.चे दरम्यान शांती हार्डवअर, ११२७,रविवार पेठ,पुणे ते हमजेखान चौकाचे दरम्यान

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे भावाचे गंज पेठ,पुणे येथे सोन्या-चांदी विक्रीचे दुकान आहे. फिर्यादी हे त्याचे दुकानातुन रविवार पेठ येथे पायी सोन्याचे बिस्कीट टंच काढुन वेढणी करण्यासाठी जात असताना,शांती हार्डवअर,११२७ रविवार पेठ,पुणे ते हमजेखान चौका दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने,गणेशउत्सवा निमीत्त रस्त्यावरती जमलेल्या गर्दीचा फायदा घेऊन,फिर्यादी यांचे गळयातील बॅगेचे उजव्या बाजुला कश्याचेतरी सहाय्याने कट करुन,बॅगे मधील सोन्याचे बिस्कीट ४,१७,३३८/- किचे चोरी करुन नेले आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, प्रतिक्षा शेंडगे ७०२०२६५२३२

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** विश्रामबाग पो स्टे २०६/२०२३,भादविक ४१३,३८१

**फिर्यादी** आशिष शर्मा,वय ५८ वर्षे,रा.५१५/५१६,सदाशिव पेठ,पुणे

**आरोपीत** १.दुकानातील मॅनेजर इसम २.विक्री केलेले मोबाईल त्याचा साथीदार (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०१/२०२३ रोजी ते दि.२८/०८/२०२३ रोजीचे दरम्यान २०/२२,४, शॉप नं.०६, ५१५/५१६, सदाशिव पेठ,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे सदाशिव पेठ ५१५/५१६ येथे शॉप नं.०१,शॉप नं.०३,शॉप नं.०४ नं.०५ आणि शॉप नं.०६ येथे टेलिफोन शॉपी या नावाने मोबाईल विक्रीचे दुकाने आहे. नमुद दुकानातील मॅनेजर याने फिर्यादी यांची नजर चुकवुन,त्यांचे दुकानातील ०३ वन प्लस मोबाईल, ०२ सॅमसंग मोबाईल व ०३ आयफोन असे एकुण ६,७८,०९६/- रुपये किंमतीचे मोबाईल फोन चोरी करून ते त्याचे ओळखीचा साथीदार यांस विक्री केले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. बरूरे ८३२९०८९६५१

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ६०१/२०२३,भादविक ३८०,३४

**फिर्यादी** अमित नांगरे,वय-२२ वर्षे,रा.मोडक वस्ती,आंबेगांव-खुर्द,पुणे

**आरोपीत** दोन अनोळखी महीला (अटक नाही)

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०९/२०२३ रोजी दुपारी १६/४५ वा.श्रीगणेश ज्वेलर्स,द्वारका दत्त सदन,मोडक वस्ती, जांभुळवाडी रोड,आंबेगांव-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे श्रीगणेश ज्वेलर्स या दुकानातुन नमुद दोन अनोळखी महीला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांची नजर चुकवुन दुकानातील सोन्याचे मंगळसुत्र २३,०००/- रू किमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, पी.पी.पाटील ९८९००९३०१९ / ९८२३३८५६६५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**